**नगरपरिषद प्रशासन संचालनालय,**
**शासकीय परिवहन सेवा इमारत,**
**३ रा मजला, सर पोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई - ४०० ०३०.**
**नपप्रसं /अधिकाराचे विकेंद्रीकरण/२००४/प्र.क्र.३९०/५**
**दिनांक २६ मे २००४**

वाचा : १) नगर विकास व सार्वजनिक आरोग्य विभाग, सचिवालय, मुंबई यांचेकडील अधिसूचना क्र. एमयुजी-५४७५/२१९४/युडी-१०(सी) दि. ४.६.१९७६

२) संचालक, नगरपरिषद प्रशासन, मुंबई यांचेकडील आदेश क्र. नपसु-२००१/प्र.क्र.१/२००१/५ दि. १ जानेवारी, २००१

**दुरुस्ती आदेश**

महाराष्ट्र नगरपरिषदा नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम ३०८ (१) अन्वये जिल्हाधिकारी हे नगरपरिषदेच्या ठरावास, आदेशास, कार्यवाहीस स्थगिती देऊ शकतात. अशी स्थगिती दिल्यानंतर उक्त अधिनियम कलम ३०८(४) अन्वये स्थगिती कायम करणे त्यात फेरबदल करणे इत्यादी कार्यवाही करण्यास संचालकांना असलेल अधिकार प्रादेशिक संचालकांना प्रदान करण्यांत आलेले आहेत. (संचालनालयाचे दि.१.१.२००१ रोजीचे आदेश ) व अशा प्रकरणी निर्णय घेण्यास आयुक्त व प्रादेशिक संचालक सक्षम आहेत.

परंतु अशा निर्णयावरील बाधीत पक्षकारास अपील करावयाचे झाल्यास महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरे अधिनियम १९६५ चे कलम ३१८ अन्वये सध्या हे अधिकार आयुक्त व प्रादेशिक संचालकांना असल्याने (संचालनालयाचे दि.१.१.२००१ रोजीचे आदेश) त्यांचेकडे अपील करावे लागणार आहे. अशा प्रकरणी उक्त अधिनियमाचे कलम ३०८ (४) अन्वये ज्यांनी अंतिम निर्णय घेतला आहे त्यांनीच पुन: अशा अपिलावर निर्णय घेणे उचित नाही. ही वस्तुस्थिती विचारात घेता या संचालनालयाचे दि.१ जानेवारी २००१ च्या आदेशातील परिशिष्ट-१ व परिशिष्ट-२ मध्ये पुढीलप्रमाणे सुधारणा करण्यांत येत आहे.

**परिशिष्ट-१ मध्ये मुद्दा क्र.१० चा नव्याने समावेश करण्यांत येत आहे.**

मुद्दा क्र. १० : महाराष्ट्र नगरपरिषद नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम ३०८ (४) अन्वये आयुक्त व प्रादेशिक संचालकांनी घेतलेल्या निर्णयाचे संदर्भात उक्त अधिनियमातील कलम ३१८ अन्वये अपिलावरील निर्णय संचालक नगरपरिषद प्रशासन हे घेतील.

**परिशिष्ट-२ मध्ये कलम ३१८ ला पुढीलप्रमाणे सुधारणा करण्यांत येत आहे.**

कलम ३१८ : नगरपरिषदेच्या आदेशाचे पुनरीक्षण किंवा फेरतपासणी (अधिनियमातील कलम ३०८(४) मधील प्रकरणांमध्ये आयुक्त व प्रादेशिक संचालकांनी दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने केलेली अपिले वगळून)

(सुनील सोनी)
आयुक्त तथा संचालक
नगरपरिषद प्रशासन संचालनालय

प्रति :

१) विभागीय आयुक्त व प्रादेशिक संचालक, नगरपरिषद प्रशासन (सर्व), २) जिल्हाधिकारी (सर्व) (मुंबई व मुंबई उपनगर जिल्हा वगळून), ३) अध्यक्ष, नगरपरिषदा (सर्व), ४) मुख्याधिकारी, नगरपरिषद (सर्व),
५) उपमुख्य लेखापरिक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकण, नाशिक, पुणे, औरंगाबाद, अमरावती, नागपूर.